Roll No.

Total No. of Questions : 25

Total No. of Printed Pages : 7

# R-209

## High School, Examination - 2017

## मराठी (सामान्य)

## MARATHI (General)

Time : 3 Hours ] [ Maximum Marks : 100

निर्देश : (i) प्रश्नांची उत्तरे निर्देशानुसार लिहा.

(ii) सर्व प्रश्न सोडवा.

1 कसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा : 5

(i) टिळकांनी कॉलेजात शिकत असताना ________ व्रत घेतले. (देशसेवेचे, समाजसेवेचे)

(ii) बाबा गानवदास ________ गावांत रहात होते. (छोट्या, पुपरी)

(iii) ज्ञानेश्वरांची समाधी ________ गावांत आहे. (देहू, आळंदी)

(iv) देव देतो ________ बालकांना काय म्हणूनी आम्हांस करंट्याना ? (दुर्गुणी, सद्गुणी)

(v) तुका म्हणे माझी विठ्ठल ________. (माउली, सावली)

2 जोड्या जुळवा : 5

| अ | ब |
|---|---|
| (i) माझे विजयस्मारक | (i) ग. दि. माडगूळकर |
| (ii) मृग | (ii) ना. स. इनामदार |
| (iii) जन्म टेपेची शेवटची रात्र | (iii) ल. रा. पांगारकर |
| (iv) शिक्का | (iv) अनिल |
| (v) हिंयाळा | (v) वि. दा. सावरकर |



mpcareer.in

3 खालील विधाने सत्य की असत्य लिहा :

(i) मानपदासाच्या भजनाने श्रोतृसमुदाय मुग्ध होऊन भक्तिरसात डुंबला.

(ii) स्वतः तपावे पण इतरांवर सावली धरावी हे वृक्षकुलाचे व्रत नाही.

(iii) कवि अनिल यांनी शिशिर ऋतुतील सृष्टीचे वर्णन केले आहे.

(iv) सुधाकर भालेराव यांना आकाशातील ज्योतींचे निरीक्षण करण्याचा छंद होता.

(v) मांडवगड हा माळव्यातील इतिहास प्रसिद्ध किल्ला आहे.

4 (अ) लिंग बदला :

(i) राजा

(ii) पिता

(iii) सासरा

(ब) वचन बदला :

(i) फूल

(ii) पुस्तक

5 कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य लिहा :

(i) माउलीच्या दुग्धापरी

आले............

(कवितेची ओळ पूर्ण करा.)

(ii) योग्य (विरुद्धार्थी शब्द लिहा.)

(iii) ज्याचे मूल्य करता येत नाही. (शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा.)

(iv) श्रीमंत माणसांना गर्व असतो. (विशेषण ओळखा.)

(v) मी शाळेतून आताच आलो. (सर्वनाम ओळखा.)

mpcareer.in

6 वैद्य राजांनी पागारकरांची कोणती परीक्षा घेतली ? 2

किंवा

फागू कोण होता ? तो कसा मारला गेला ?

7 अर्जुनवृक्षाने कृष्णार्जुनाला कोणता शाप दिला ? 2

किंवा

ज्ञानेश्वरांबद्दल आपणाला आदर व अभिमान का वाटतो ?

8 'मीही येते' असे म्हणणाऱ्या मुलीची काय कल्पना झाली असावी ? 2

किंवा

एकनाथांनी श्रीकृष्णाच्या मोठेपणाचे वर्णन कसे केले आहे ?

9 मातीच्या सुगंधाचा जोडावर कोणता परिणाम झाला ? 2

किंवा

पोपटाला कोणते सुख नको होते ? का?

10 खालील शब्दांचा विग्रह करा : 2

सूर्यास्त किंवा गणेश

11 समास विग्रह करा : 2

(i) महाराज

किंवा

(ii) विद्यालय



mpcareer. in

12 काळाचे मुख्य प्रकार सांगा.

किंवा

वाक्याचा काळ ओळखा :

(i) मुलाने पुस्तक वाचले

(ii) मी चेंडू खेळतो.

13 वाक् प्रचारांचा अर्थ लिहा : 2

अंग धरणे किंवा आभाळ फाटणे

14 कविने चंदनावर कोणता आरोप केला आहे ?. 4

किंवा

नेत्याचे वर्णन करतांना कोणकोणती विशेषणे वापरून कवि नेत्याची महत्ता सांगतात?

15 आपल्या अभंगात नामदेवांनी कोणकोणत्या दुर्लभ गोष्टी सांगितल्या आहेत ? 4

किंवा

रामदासांनी उत्तम पुरुषाचे कोणते गुण वर्णिले आहेत ?

16 डॉ. आंबेडकरांच्या मनांत भक्तिभाव कसा निर्माण झाला ? 4

किंवा

सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा का झाली होती ? त्यांना कोठे ठेवण्यात आले होते ?

17 मांडवगड कोठे आहे ? हा किल्ला कसा सुरक्षित झाला आहे ? 4

किंवा

देश रक्षणाची पाच तत्वे कोणती ?



mpcareer.in

18 खालील पैकी एका लेखकाचा परिचय लिहा : 4

मा. ग. गोरे किंवा अ. गो. शेवडे.

19 (अ) समानार्थी शब्द लिहा : 4

(i) आकाश

(ii) पृथ्वी

(ब) अव्ययाची व्याख्या सांगा.

20 संदर्भ सहित अर्थ स्पष्ट करा : 5

"आज अंतरात भीती
खुल्या चांदण्याची चोडी
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी"

किंवा

"चढली शिशिर ऋतूची कळा
आली सृष्टीवरी अवकळा
सुटले सोसाटयाचे वारे
गोठले हिमाद्रित गंगाजल सारे"

http://www.mpboardonline.com

21 संदर्भ सहित अर्थ स्पष्ट करा : 5

"निशाण अमुचे मनःक्रांतिचे
समतेचे अन् विश्वशांतिचे
स्वास्तिचिह्न हे युगायुगांचे ऋषिमुख तेज महान"

किंवा

"रत्न सोने मातीत जन्म घेते,
राजराजेश्वर नित शिरी धरी ते,
कमळ होते पंकात, तरी येतें"
वसंत श्री सत्कार करायाते.



mpcareer.in

22 संदर्भ सहित स्पष्टीकरण द्या । 5

"अरे, दौलत, मीही एक माणूसच आहे. तुझ्यापेक्षा शहाणा असं येता हो।"

किंवा

"परमेश्वराच्या फुलबागेचा नयनरम्य देखावा माझें लक्ष वेधुन घेतो."

23 खालील उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा : 5

मनुष्याच्या अंगी कोणताही गुण असला तरी परिश्रमाखेरीज व अभ्यासा खेरीज त्याचे तेज पडावयाचे नाहीं. खाणीतुन खणून काढलेला हिरा मुळांत तेजस्वी नसतो त्याप्रमाणेंच गुणीजनांच्या अंगी असणारी कलाही शिक्षणाखेरीज प्रकट होत नाहीं. वक्तृत्व हे जरी जन्मासिद्ध असले पाहिजे तरी ते विद्वत्तेखेरीज पूर्ण शोभा देत नाहीं. ज्यांना आपल्या भाषणाने रसिकांची मनें वळवावयाची असतील त्यांनि भाषाशुद्धता, अर्थसंगती, सुंदर व प्रौढ विचार साध्य केले पाहीजेत. या खेरीज अनेक विषयांची माहिती त्याला असली तर चांगलेच भाषणांस वैविध्य, मनोरंजकता आणण्यांस ती उपयोगी पडते. आणखी एक प्रभावी साधन म्हणजे अनुकरण कोणताही गुण साध्य करुन घेण्यास अनुकरणांसारखा उत्तम मार्ग नाहीं.

(i) मनुष्याच्या गुणाचे तेज कशामुळे वाढते ?

(ii) खाणीतुन काढलेला हिरा कसा असतो ?

(iii) वक्तृत्वाला कशाची गरज आहे ?

(iv) भाषण मनोरंजक करण्यासाठी मनुष्याने काय केले पाहिजे ?

(v) अनुकरणाचें महत्व सांगा.

24 जिल्हास्तरीय काव्यवाचन स्पर्धेत प्रथम आलेल्या तुमच्या मित्रांस अभिनंदन करणारे पत्र लिहा. 5

किंवा

तुमच्या शाळे समोरील बऱ्याच दिवसापासून नादुरुस्त असलेला रस्ता लवकर दुरुस्त करुन घेण्यासंबधी नगराध्यक्षांना विनंती – पत्र लिहा.

mpcareer.in

25. खालील पैकी कोणत्याही एका विषयावर 250-300 शब्दांचा निबंध लिहा : 10

(i) साक्षरता विकासाचा पाया

(ii) माझा आवडता लेखक

(iii) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

(iv) पुस्तकाचे आत्मवृत्त

(v) विज्ञानाचे महत्त्व

---

mpcareer. in